पोलीस निरीक्षक माणगांव पोलीस ठाणे

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** रायगड  **P.S.(ठाणे):** माणगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0297  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/09/2023 23:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 15/09/2023

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/09/2023

**Time From (वेळेपासून):** 13:55 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/09/2023  **Time (वेळ):** 22:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 028

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/09/2023 23:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.500 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उपोषाकार कार्यालय माणगाव तालुक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती काशिबाई तुकाराम महाबळे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1961
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | साईनगर, तामाणगांव,साईनगर, तामाणगांव,माणगांव,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | साईनगर, तामाणगांव,साईनगर, तामाणगांव,माणगांव,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-8793915220

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामचंद्र रामचंद्र पवार | | | 1. 202,एक्सल कलनीच्या जवळ, रूपराज बिल्डींग, बी विंग, दुसर, रोहा,रोहा,रायगड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी श्रीमती काशिबाई तुकाराम महाबळे, वय 62 वर्षे, रा. माणगांव- साईनगर, ता.माणगांव जि.रायगड, मो.नं. 8793915220 समक्ष माणगांव पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देते की,

मी वरील ठिकाणची रहिवासी आहे. मी उपजिल्हा रूग्णालय माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड येथून कक्षसेविका म्हणून सन 2021 मध्ये सेवानिवृत्त झाले आहे. सेवानिवृत्तीनंतर माझे भविष्य निर्वाह निधी, ग्रॅज्युएटी, सातवा वेतन आयोग फरकाची रक्कम उप कोषागार अधिकारी कार्यालय माणगांव यांचेकडून पुर्तता होवून माझे बॅन्क खात्यावर जमा झालेली आहे.

मुख्य कोषागार कार्यालय, महर्षी कर्वे मार्ग, 2 रा.मजला मुंबई यांचेकडील दि.09/08/2023 रोजीचे पत्रान्वये मला सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेनुसार ग्रॅज्युएटीचा फरक रक्कम रूपये 45,050/- इतकी मंजूर झालेबाबत कळवीण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने मी दिनांक 12/09/2023 रोजी उप कोषागार अधिकारी कार्यालय माणगांव येथे जावून तेथील संबंधीत अधिकारी लोकसेवक श्री. पवार यांचेकडे चौकशी केली असता, लोकसेवक श्री. पवार यांनी माझी सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेनुसार ग्रॅज्युएटी फरकाची रक्कम बॅन्केत जमा करण्याची मंजूर देणेकरीता माझेकडे रूपये 6,000/- रक्कमेच्या लाचेची मागणी केली.

तरी मला लोकसेवक श्री.पवार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांचेविरूध्द लाच मागणी प्रकरणी कारवाई होणेकरीता मी दिनांक 13/09/2023 रोजी पोलीस निरीक्षक, श्री.नवनाथ चौधरी अॅन्टी करप्शन ब्युरो रायगड यांचेकडे माणगांव येथे तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 14/09/2023 रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणी मध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल अशा पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांनी सुचना देवुन मला दि.14/09/2023 रोजी सकाळी 10.45 वा. माणगांव निजामपूर रोड लगत असलेल्या अमित कॉम्प्लेक्स चे जवळ हजर रहाण्याबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी दिनांक 14/09/2023 रोजी 10.55 वा. माणगांव निजामपूर रोड, अमित कॉम्प्लेक्स जवळ हजर राहिले. तेथे पोलीस निरीक्षक, श्री.नवनाथ चौधरी, अॅन्टी करप्शन ब्युरो रायगड यांची भेट घेतली. त्यांनी त्यांचे पथकासोबत हजर असलेले इसमांपैकी दोन इसम पंच साक्षीदार असल्याचे सांगून त्यांची नाव पंच 1) श्री.दिनेश सोनाजी शर्मा, सहा.मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पेण, जि.रायगड, व 2) श्री.दत्तात्रेय शामराव जगताप, सहा.मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पेण, जि.रायगड अशी असल्याचे सांगीतले. व त्यांचेशी ओळख करून दिली. तसेच पथकातील हजर अंमलदार यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री.चौधरी यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री.चौधरी यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास व पंचांस माहिती देवून योग्य त्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे 11.20 वा. माझी व पंचांची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकॉर्डरध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री.चौधरी यांनी पडताळणीकरीता खाजगी खाजगी मारूती सुझुकी इर्टिगा कार क्रमांक एमएच/06/सीडी-8859 या वाहनाने पंच नं.1 श्री.दिनेश शर्मा यांचेसह लोकसेवक श्री.पवार, उप कोषागार कार्यालय माणगांव यांना भेटणेकरीता उप कोषागार कार्यालय माणगांव येथे जाण्याच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सुमारे 11.36 वाजता माझे कडे व्हाईस रेकॉर्डर सुरू करून देण्यात आले. मारूती सुझुकी इर्टिगा कार क्रमांक एमएच/06/सीडी-8859 या वाहनाने पंच नं.1) श्री.दिनेश शर्मा यांचेसह मी उप कोषागार माणगांव कार्यालयामध्ये गेलो. तेथे लोकसेवक श्री.पवार हे हजर होते. त्यांना माझ्या मंजूर असलेल्या सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेनुसार ग्रॅज्युएटी फरकाची रक्कम बॅन्केत जमा करण्याची मंजूरी देणेसाठी विनंती केली असता, त्यांनी माझ्या सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेनुसार ग्रॅज्युएटी फरकाची रक्कम

बॅन्केत जमा करण्याची मंजूरी देणेसाठी माझेकडे सहा हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी आणि पंच श्री. दिनेश शर्मा असे खाजगी इर्टिगा कारने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12.15 वा.परत आलो. सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री.चौधरी यांनी सदर संभाषणावरून लोकसेवक श्री.पवार, यांनी सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेनुसार ग्रॅज्युएटी फरकाची रक्कम बॅन्केत जमा करण्याची मंजूरी देणेसाठी 6,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले असल्याने लोकसेवक श्री.पवार यांच्याविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्याचे ठरवून लाचेची रक्कम रूपये 6,000/- रूपये देणेबाबत मला सुचना दिल्या. परंतू मला दुपारी 01.00 वा. माझे बहिणीच्या मयत पतिच्या पिंडदान विधीसाठी माझे व माझे बहिणीच्या कुटुंबासह हरिहरेश्वर श्रीवर्धन येथे जाण्यासाठी निघायचे असल्याने आता लगेच मी पुढील कार्यवाहीकरीता उपलब्ध होवू शकणार नसल्याचे पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांना सांगीतले. व सायंकाळी 06.00 वा. पर्यंत हरिहरेश्वर येथून माणगांव येथे आलेवर पुढील कार्यवाही करावी अशी विनंती केली. बहिणीच्या पतीच्या पिंडदान विधीला मी हजर न राहण्याने नात्यागोत्यात मी रोषाला कारणीभूत ठरेन हे मी श्री.चौधरी साहेबांना सांगीतल्यानंतर त्यांनी माझा नाईलाज लक्षात घेवून आपण हरिहरेश्वर येथून सायंकाळी 06.00 वा. याच ठिकाणी हजर झालेवर पुढील कार्यवाही करण्याचे निश्चित करीत असल्याचे सांगून मला सायंकाळी 06.00 वा. याच ठिकाणी पुढील कार्यवाहीकरीता हजर राहणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी दुपारी 12.50 वा. तेथून निघून माझे घरी आले.

त्यानंतर दुपारी 01.30 वा. माझे बहिणीच्या व माझे कुटुंब व नातेवाईकांसह माणगांव येथून वाहनांनी निघून 03.00 वा. हरिहरेश्वर येथे गेले. आम्हाला पिंडदान विधी करून घेण्याकरीता हरिहरेश्वर येथे सायंकाळी उशिरापर्यंत थांबावे लागले. सोबतच्या नातेवाईकांमधून एकटीनेच निघून येणे मला शक्य नव्हते. सायंकाळी 18.00 वा.चे सुमारास श्री.चौधरी यांनी मला कॉल करून अद्यापपर्यंत कार्यवाहीकरीता मी हजर झालेली नसल्याचे लक्षात आणून दिले. त्यावेळी अजून उशिर लागणार असून आम्हाला माणगांव येथे पोहोचण्यास रात्रीचे 09.30 ते 10.00 वाजणार असल्याचे मी त्यांना कळवीले. व आपली पुढील कार्यवाही उद्या दिनांक 15/09/2023 रोजी सकाळी करावी अशी मी त्यांना विनंती केली. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांनी माझी अडचण लक्षात घेवून मी दिनांक 15/09/2023 रोजी सकाळी 11.00 वा. माणगांव निजामपूर रोड, अमित कॉम्प्लेक्स जवळ हजर राहण्याबात मला सुचना दिल्या.

त्यानंतर दिनांक 15/09/2023 रोजी मी माणगांव निजामपूर रोड, अमित कॉम्प्लेक्स जवळ 11.45 वा. हजर झाले. तेथे पोलीस निरीक्षक, श्री.चौधरी हे सापळा पथकामधील अंमलदार व पंच 1)श्री.दिनेश सोनाजी शर्मा, व पंच 2) श्री.दत्तात्रेय शामराव जगताप हे हजर होते.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांनी सांगितले की, दिनांक 14/09/2023 रोजी पडताळणीचे वेळी लोकसेवक श्री.पवार हे 6,000/- रूपये लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न होत असल्याने त्यांचेविरूध्द उप कोषागार माणगांव कार्यालय येथे सापळा कारवाई आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगून सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही सुरु केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांनी मला सदर सापळ्याचेकामी लाचेची रक्कम म्हणून वापरण्यासाठी रक्कम 6,000/-रूपये आहेत का? असे विचारले असता मी 6,000/-रूपये आणले असल्याचे सांगुन, मी माझे जवळील 6,000/-रूपये रक्कम (500/- रू. दराच्या 12 नोटा) पोलीस निरीक्षक श्री. चौधरी यांचेकडे हजर केली. त्यानंतर माझे कडे अॅंथ्रासीन पावडर लावलेले लाचेची रक्कम 6,000/- रूपये माझे पर्सचे मधल्या कप्प्यात ठेवले. त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री.चौधरी यांनी मला, पंचानं ा, पथकातील अंमलदार यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर 12.38 वाजता माझी तसेच पंचांची वक्तव्य घेवून त्यानंतर सापळा कारवाई करीता माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर देण्यात आले. त्यानंतर मी व माझे सोबत पंच नंबर 1 श्री. दिनेश शर्मा, व पोना/सचिन आटपाडकर असे मारूती सुझुकी डिझायर कारमध्ये, तसेच पोलीस निरीक्षक श्री.चौधरी, पंच नं.2 श्री. दत्तात्रेय जगताप, सापळा पथकातील अन्य अंमलदार असे मारूती सुझुकी इर्टिगा कार क्रमांक एमएच/06/सीडी-8859 मध्ये बसलो व पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांचे सुचनेवरून उप कोषागार कार्यालय माणगांव येथे रवाना झालो. दोन्ही वाहने अमित कॉम्प्लेक्स जवळून निजामपूर माणगांव रोडने पढे कालवा रोडला वळून कालवा रोडने माणगांव मध्यवर्ती शासकिय इमारती जवळ आल्यावर दोन्ही वाहने रोडचे बाजूला थाबवण्यात आली. प्रथम मी व पंच नं.1 श्री. शर्मा असे उतरून मध्यवर्ती शासकिय इमारतीमध्ये असलेल्या उप कोषागार कार्यालयात गेलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.चौधरी, पंच नं.2 श्री.जगताप व सापळा पथकातील अंमलदार हे वाहनातुन उतरून कार्यालयाचे आवारात कोणास संशय येणार नाही अशा रीतीने थांबून राहीले.

मी व पंच नंबर 1 श्री.शर्मा असे उप कोषागार माणगाव कार्यालयामध्ये जावुन लोकसेवक श्री.पवार यांची भेट घेवुन

माझ्या सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेनुसार ग्रॅज्युएटी फरकाची रक्कम बॅन्केत जमा करण्याची मंजूरी बाबत चर्चा केली. व त्यांनी मागणी के◌ेलेली 6,000/-रूपये लाचेची रक्कम लोकसेवक श्री.पवार यांचेकडे दिली. ती लोकसेवक श्री.पवार यांनी त्यांचे पॅन्टचे उजवे खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी व पंच श्री.शर्मा असे उप कोषागार कार्यालयाबाहेर येवून सापळा पथकास इशारा म्हणून मी माझे डोळ्यांवरील चष्मा काढून हातात घेवून लोकसेवक श्री. पवार यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला. त्यावेळी सुमारे 13◌:55 वाजण्याचे सुमारांस अ◌ॅन्टी करप्शन पथकाने लोकसेवक श्री.पवार यांना रंगेहाथ पकडले.

अशा रितीने माझी मुख्य कोषागार कार्यालय, महर्षी कर्वे मार्ग, 2 रा मजला मुंबई येथून मंजूर झालेली सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेनुसार ग्रॅज्युएटीचा फरक 45,050/- रूपये बॅन्केत जमा करण्याची मंजूरी देणेसाठी माणगाव उप कोषागार कार्यालयाचे उप कोषागार अधिकारी श्री.मारूती रामचंद्र पवार यांनी दिनांक 14/09/2023 रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष त्यांचे कार्यालयामध्ये 6,000/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. व दिनांक 15/09/2023 रोजी 13.55 वाजता माझेकडून उपकोषागार कार्यालय माणगांव येथे पंच साक्षीदारांसमक्ष लोकसेवक श्री. मारूती रामचंद्र पवार, उप कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय माणगांव यांनी 6,000/- रू.लाचेची रक्कम स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांचेकडून लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे.

म्हणुन माझी श्री.मारूती रामचंद्र पवार, वय 56, उप कोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड, सध्या रा. रूपराज बिल्डींग, बी विंग, दुसरा मजला, रू.नं.202, रोहा, एक्सल कॉलनीच्या जवळ, ता.रोहा, जि.रायगड, मुळ रा.बामणोली, ता. माणगांव, जि.रायगड यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Rajendra Pandurang Patil(I (Inspector)) / DGPEPPM73 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Rajendra Pandurang
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPEPPM73

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**